**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०/२०१७ मधील नि. ८६,८८ व ९०**
**खालील संयुक्त आदेश**

श्री. सुभाष यशवंत शितोळे    अर्जदार

*विरुद्ध*

श्री.राजेंद्र महादेव शितोळे    सामनेवाला

१. प्रस्तुत अर्जातील सामनेवाला क्र. ३६ बळवंत राजाराम शितोळे हे दि.१३/०८/२०१७ रोजी मयत झाले आहेत. या कामी मयत सामनेवाला क्र.३६ यांचे वारस दाखल करणे आवश्यक आहे. अर्जात नमुद वारसांव्यतिरीक्त सदर सामनेवाला क्र.३६ यांस अन्य कोणीही वारस नाहीत.

२. सदर मयत सामनेवाला क्र.३६ हे मयत झाल्याच्या तारखेपासून वारस रेकॉर्डवर आणण्याकरीता सुमारे ४ दिवसांचा उशीर झाला आहे. तो उशीर माफ करणेत येवुन अबेटमेंटचा आदेश सेट असाईड करुन मयत सामनेवाला क्र.३६ यांचे अर्जात नमुद वारसांना त्यांचे वारस म्हणुन प्रस्तुत अर्जाचे कामी पक्षकार करण्यात यावे व तशी अर्जात दुरुस्ती करण्याची अर्जदारांना परवानगी देण्यात यावी, यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर अर्जाकामी सामनेवाला यांनी म्हणणे दाखल केलेले नाही.

४. अर्जांचे अवलोकन केले.वाद विषयाचे अंतिम निराकरणाकरीता अर्जात आवश्यक पक्षकारांना सामील करुन घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे नि. ८६ वरील विलंब माफी अर्ज मंजुर करुन व नि. ८८ वरील अबेटमेंटचा आदेश सेट असाईड करुन अर्जात नमूद आवश्यक पक्षकारांना अर्जाचे कामी सामील करणेस व तशी अर्जात दुरुस्ती करणेस परवानगी देणे

न्यायोचित आहे. सबब, खालील आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. नि.८६, ८८ व ९० वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.

२. अर्जदारतर्फे, अर्जदार यांचे अर्जात नमूद आवश्यक पक्षकार, अर्जाचे कामी विहित मुदतीत समाविष्ट करावेत व तशी दुरुस्ती करावी.

दिनांकः- २३/०३/२०२२ (एम्.क्यु.एस्.एम्.शेख)

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी.